**<u>ठळक बातम्या</u>**

- केवायसी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी सर्व वित्तीय नियामकांनी एकत्रितपणे प्रयत्न करावेत, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांचं आवाहन

- पश्चिम बंगाल आणि तमिळनाडूत कुठल्याही मतदान केंद्रावर पुन्हा मतदान घ्यायची गरज नसल्याचा निवडणूक आयोगाचा निर्वाळा

- इराणच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या पाकिस्तानच्या उच्चाधिकाऱ्यांसोबत बैठका, अमेरिकेबरोबर कोणतीही चर्चा नियोजित नसल्याची इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाची माहिती

**आणि**

- भारत आणि दक्षिण आफ्रिका महिला क्रिकेट संघांदरम्यान चौथा टी-२० सामना आज रंगणार

**<><><><><>**

केवायसी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी आणि नागरिकांना वारंवार केवायसी करावं लागू नये यासाठी देशातल्या सर्व वित्तीय नियामकांनी एकत्रितपणे प्रयत्न करावेत, असं आवाहन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज केलं. सेबीच्या स्थापना दिनानिमित्त मुंबईत आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. देशातला एखादा शेअर बाजार, शेअर दलाल किंवा संबंधितांवर सायबर हल्ला झाला, तर त्यामुळे होणारं नुकसान भरून यायला मोठा काळ जाऊ शकतो. त्यामुळे सायबर हल्ले, कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे निर्माण झालेल्या आव्हानांचा सामना करण्यासाठी सेबीनं मजबूत यंत्रणा तयार करावी,

अशी सूचना त्यांनी केली. सीमेपलीकडून होणाऱ्या गैरव्यवहारांचा सामना करण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या नियामकांशी संपर्क वाढवावा, असंही सीतारमण यांनी सांगितलं. गुंतवणूकदारांमध्ये जागृती करण्यासाठीच्या सेबीच्या अभियानाचा प्रारंभ यावेळी अर्थमंत्र्यांनी केला. देशातले सर्व शेअर बाजार, म्युच्युअल फंड संघटना आणि इतर संस्थांच्या मदतीनं हे अभियान राबवलं जाणार आहे.

**<><><><><>**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातली ४४ हजार ३७६ मतदान केंद्रं आणि तमिळनाडूतल्या ७५ हजार ६४ मतदान केंद्रांपैकी कुठेही पुन्हा मतदान घ्यायची शिफारस करण्यात आलेली नसल्याचं निवडणूक आयोगानं सांगितलं. या दोन्ही राज्यांमध्ये मतदानादरम्यान कोणताही मोठा गैरप्रकार घडलेला नाही, असंही आयोगानं नमूद केलं. तमिळनाडूच्या सर्व २३४ जागांसाठी यंदा ८५ पूर्णांक १५ टक्के मतदानाची नोंद झाली. तर पश्चिम बंगालमध्ये पहिल्या टप्प्यात १६ जिल्ह्यांमधल्या १५२ मतदारसंघांमध्ये विक्रमी ९२ पूर्णांक ७२ टक्के मतदान झालं होतं. दुसऱ्या टप्प्याचं मतदान २९ एप्रिल रोजी होणार आहे.

पश्चिम बंगालमध्ये सुरू असलेल्या निवडणूक प्रक्रियेदरम्यान गैरप्रकार आणि निष्पक्षपणे काम न केल्याबद्दल ५ पोलीस अधिकाऱ्यांच्या निलंबनाचे आदेश निवडणूक आयोगानं दिले आहेत. त्यांच्या विरोधात विभागीय कारवाईही सुरू करण्यात आली आहे.

**<><><><><>**

पश्चिम बंगाल विधानसभेच्या दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्याच्या प्रचाराची रणधुमाळी आणखी तीव्र झाली आहे. विविध राजकीय पक्षांचे ज्येष्ठ नेते प्रचाराच्या रिंगणात उतरत आहेत. भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज जमालपूर आणि हावडा इथं प्रचारसभा घेणार आहेत. तर काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या सभा हुगळी, कोलकाता आणि मेतियाब्रुज इथं होणार आहेत.

<><><><><>

केंद्र सरकारनं सध्याच्या हंगामासाठी किमान हमीभावानं गहू खरेदी करण्याचं लक्ष्य १५ टक्क्यांनी वाढवून साडेचौतीस दशलक्ष टनावर नेलं आहे. यापूर्वी सरकारनं ३० दशलक्ष टन गहू खरेदीचं उद्दिष्ट ठेवलं होतं. अवकाळी पावसाचा फटका बसलेल्या शेतकऱ्यांना आधार देण्याच्या उद्देशानं ही वाढ केल्याचं अन्न विभागाचे सचिव संजीव चोप्रा यांनी काल नवी दिल्लीत आटा उत्पादक महासंघाच्या वार्षिक गहू सर्वेक्षण अहवालाच्या प्रकाशनप्रसंगी सांगितलं. राज्यनिहाय गहू खरेदीचं लक्ष्यही वाढवण्यात आल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता 'मन की बात' या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधतील. हा या कार्यक्रमाचा १३३ वा भाग असून त्याचं थेट प्रसारण आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवर, एआयआर न्यूज या संकेतस्थळावर आणि न्यूज ऑन एअर मोबाईल ॲपवर केलं जाणार आहे. त्याचप्रमाणे AIR न्यूज, डीडी न्यूज तसंच प्रधानमंत्री कार्यालय आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या यूट्यूब वाहिन्यांवरून हा कार्यक्रम थेट प्रक्षेपित होईल.

**<><><><><>**

जनगणना २०२७ साठी १-८-५-५ हा राष्ट्रीय निःशुल्क मदत क्रमांक सुरू केला आहे. देशभरातली सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये हा क्रमांक वापरता येणार आहे. या क्रमांकावरून गृहसूची आणि गृहगणना प्रक्रियेबाबत इंग्रजीसह प्रादेशिक भाषांमधून मार्गदर्शन उपलब्ध करून दिलं जाईल. जनगणनेच्या महत्त्वाच्या राष्ट्रीय कार्यात नागरिकांना सुलभतेनं सहभाग घेता यावा, आणि त्यांच्या शंकांचं निरसन करता यावे या उद्देशानं ही सुविधा सुरु केली गेली आहे.

**<><><><><>**

इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी आज पाकिस्तानचे फील्ड मार्शल असीम मुनीर यांची इस्लामाबाद इथं भेट घेतली. इराणच्या वरिष्ठ शिष्टमंडळासह अब्बास अराघची काल इस्लामाबाद इथं पोहोचले. आज इतर उच्चाधिकाऱ्यांशीही अराघची चर्चा करणार आहेत. पश्चिम आशियातला संघर्ष थांबवणं आणि या भागात शांतता पुनर्स्थापित करण्याबाबत या बैठकांमध्ये चर्चा होणार आहे. मात्र या भेटीदरम्यान अमेरिकेबरोबर कोणतीही थेट बैठक नियोजित नसल्याचं इराणच्या परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे. तर दुसरीकडे, अमेरिकेचे विशेष दूत स्टीव्ह विटकॉफ आणि जॅरेड कुशनर इराणशी चर्चा करण्यासाठी इस्लामाबादला जाणार असल्याचं अमेरिकेनं सांगितलं आहे. अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स राजधानी वॉशिंग्टनमधून समन्वय साधणार असल्याची माहिती व्हाइट हाऊसच्या प्रेस सेक्रेटरी कॅरोलाइन लिव्हिट यांनी दिली आहे.

दरम्यान, पाकिस्तानमध्ये शांतता चर्चा पुन्हा सुरु होण्याची शक्यता असताना, अमेरिकेच्या मागण्या पूर्ण करणारा प्रस्ताव मांडण्याची इराणची तयारी सुरू आहे, असा दावा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काल केला. इराणनं समृद्ध युरेनियमवरचा हक्क सोडणं आणि होर्मूझच्या सामुद्रधुनीतून तेलवाहू जहाजांची मुक्त वाहतूक सुनिश्चित केल्याशिवाय कोणताही करार होणार नाही, याचा पुनरुच्चार ट्रम्प यांनी केला.

**<><><><><>**

चर्नोबिल दुर्घटनेला ४० वर्षं पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर, संयुक्त राष्ट्रांची काल एक विशेष आमसभा झाली. अण्वस्त्रांचा शांततापूर्ण उद्देशांसाठी वापर करावा असं आवाहन आमसभेनं यावेळी केलं. अणुतंत्रज्ञानाचा वापर शांततापूर्ण उद्देशासाठी केला गेला, तरी हे तंत्रज्ञान इतर तंत्रज्ञानापेक्षा पूर्णतः वेगळं असल्याची शिकवण चेर्नोबिल दुर्घटनेच्या भीषणतेनं आपल्याला दिली असल्याचं आमसभेच्या अध्यक्ष अनालिना बेअरबॉक यांनी सांगितलं.

युक्रेनमधल्या चेर्नोबिल अणुऊर्जा प्रकल्पात २६ एप्रिल १९८६ रोजी एका अणुभट्टीत झालेल्या साखळी स्फोटांमुळे युक्रेन, बेलारूस आणि युरोपच्या इतर भागांमध्ये किरणोत्सर्ग पसरला होता. या दुर्घटनेत ८० लाखापेक्षा जास्त लोक किरणोत्सर्गानं बाधित झाले, तर हजारो लोकांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेनंतर असंख्य लहान मुलांना रक्ताचा कर्करोग आणि इतर गंभीर आजारही जडले होते. अणुदुर्घटनांचे परिणाम संपूर्ण जगाला भोगावे लागतात, हा धडा चेर्नोबिल घडनेनं आपल्याला दिला असं मत संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी व्यक्त केलं. कोणत्याही तंत्रज्ञानाचा वापर करताना योग्य सावधगिरी बाळगली नाही तर ते तंत्रज्ञान धोक्याचे स्त्रोत बनू

शकतात, असं मत रशियाचे संयुक्त राष्ट्रांतील उपस्थायी प्रतिनिधी दिमित्री चुमाकोव्ह यांनी व्यक्त केलं.

**<><><><>**

तेलंगणा जागृती या संघटनेच्या अध्यक्ष आणि माजी मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांच्या कन्या के. कविता यांनी आज 'तेलंगणा राष्ट्र सेना' या नव्या राजकीय पक्षाची घोषणा केली. हैदराबादमध्ये आयोजित एका कार्यक्रमात त्यांनी पक्षाच्या नावाचं अनावरण केलं. कालेश्वरम उपसा सिंचन प्रकल्पाच्या मुद्द्यावरून झालेल्या वादानंतर के. कविता यांची भारत राष्ट्र समिती या पक्षातून हकालपट्टी झाली होती.

**<><><><>**

आध्यात्मिक गुरु आणि नारायण गुरुकुलमचे प्रमुख गुरू मुनी नारायण प्रसाद यांचं आज केरळच्या तिरुवनंतपुरम इथं निधन झालं. ते ८७ वर्षांचे होते. पेशाने स्थापत्य अभियंते असलेले नारायण प्रसाद यांनी १९६८मध्ये नारायण गुरुकुलममध्ये प्रवेश केला आणि १९९९ मध्ये ते या संस्थेचे प्रमुख झाले. मुनी नारायण प्रसाद यांनी भारतीय तत्वज्ञानावर १०० हून अधिक पुस्तकं लिहिली आहेत. त्यांच्या योगदानाबद्दल त्यांना पद्मश्री आणि केरळ साहित्य अकादमी पुरस्कारासह इतर अनेक पुरस्कारांनी गौरवण्यात आलं होतं.

**<><><><>**

भारत आणि दक्षिण आफ्रिकेच्या महिला क्रिकेट संघांमध्ये सुरू असलेल्या ५ सामन्यांच्या टी-२० मालिकेतला चौथा सामना आज जोहान्सबर्ग इथं होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री साडेनऊ वाजता

सामन्याला सुरुवात होईल. याआधीचे तीनही सामने जिंकून दक्षिण आफ्रिकेनं मालिकेत विजयी आघाडी घेतली आहे. आता उर्वरित दोन सामने जिंकण्याचा भारतीय संघाचा प्रयत्न असेल.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज पहिल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्ससमोर सामना पंजाब किंग्सचं आव्हान असणार आहे, तर दुसरी लढत राजस्थान रॉयल्स आणि सनरायजर्स हैदराबाद यांच्यात होणार आहे.

दरम्यान, काल झालेल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुनं गुजरात टायटन्सचा ५ गडी राखून पराभव केला. गुजरातच्या संघानं विजयासाठी दिलेलं २०६ धावांचं आव्हान बंगळुरुनं १८ षटकं आणि ५ चेंडूत पूर्ण केलं.

//<><><><><>//